आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 05/05/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 117 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# सुनेत्रा पवारांचा दणदणीत विजय!

## बारामतीत सुनेत्रा पवार तब्बल 2 लाख 14 हजार मताधिक्याने विजयी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**बारामती : बारामती पोटनिवडणुकीत राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी 2 लाख 14 हजार 93 मताधिक्याने विजयी साकारला. त्यांना 2 लाख 18 हजार 930 मते मिळाली, तर त्यांच्याविरोधात असलेल्या 22 उमेदवार आणि 'नोटा' यांना 4837 मतांवर समाधान मानावे लागले. बारामतीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 2019 मध्ये केलेला मताधिक्याचा विक्रम उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मोडला.**



अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेत निधनानंतर ही पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. मात्र, 22 उमेदवारांनी माघार न घेतल्याने मतदान घ्यावे लागले. या निकालाची औपचारिकता बाकी होती. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या अजित पवार यांचा बारामतीतील मताधिक्याचा विक्रम मोडणार का, याकडे सर्वांचे लक्ष होते. अपेक्षेप्रमाणे त्यांनी विक्रमी मताधिक्य मिळविले.बारामती पोटनिवडणुकीसाठी मतदारांमध्ये निरुत्साह राहिल्याने सुमारे 58.27 टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. या मतदारसंघात तीन लाख 84 हजार 579 मतदार असून, त्यापैकी दोन लाख 24 हजार 87 मतदारांनी मतदान केले. बारामतीतील मताधिक्याचा विक्रम दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावावर होता.अजित पवार यांनी 2019 मध्ये भाजपचे तत्कालीन उमेदवार गोपीचंद पडळकर यांचा एक लाख 65 हजार 265 मताधिक्याने पराभव केला होता. हा विक्रम मोडून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या दोन लाख 14 हजार 93 मताधिक्याने विजयी झाल्या.

बारामतीतील एमआयडीसी येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे गोदाम येथे सकाळी मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर टपाली आणि पहिल्या फेरीपासून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या आघाडीवर होत्या. पहिल्या फेरीत 6500 मते मिळवत त्यांनी आघाडी घेतली. दुसऱ्या फेरीअखेर 16543 मते, तिसऱ्या फेरी 26773 मते, पाचव्या फेरी अखेर 44796 मते, सहाव्या फेरीअखेर 50 हजार मतांचा आकडा पार करण्यात आला. त्यानंतर मताधिक्य वाढत गेले. 24 व्या फेरीअखेर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या विक्रमी मतांनी विजयी झाल्याचे घोषित करण्यात आले.

# सर्वसामान्यांच्या सेवेसाठीच 'टेक-वारी'! – मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : तंत्रज्ञानाचा अंतिम उद्देश हा सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ करणे आहे. सर्वसामान्य माणूस हाच आपला 'विठ्ठल' असून त्याच्या सेवेसाठीच टेक वारी आहे. केवळ तंत्रज्ञान नव्हे तर मानवी संवेदना, मानसिक आरोग्य, आत्मपरीक्षण "आर्ट ऑफ हँडलिंग क्रिटिसिझम" विषयही प्रशासनासाठी महत्त्वाचा आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या 'टेक वारी' उपक्रमाच्या माध्यमातून राज्यात नागरिक-केंद्रित प्रशासनाचा वेगवान रोडमॅप राबविला जात असून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शासन अधिक कार्यक्षम आणि सुलभ करण्यावर भर दिला जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**




मंत्रालयातील त्रिमुर्ती प्रांगणात सामान्य प्रशासन विभागातर्फे आयोजित 'टेक-वारी 2.0' अंतर्गत 'महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, केंद्र सरकारच्या क्षमता बांधणी आयोगाच्या अध्यक्ष राधा चौहान, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही.राधा उपस्थित होते. कार्यक्रमास विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.मुख्यमंत्री म्हणाले की, प्रशासनात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नागरिकांचे जीवन अधिक सुलभ करण्यासाठी 'टेक वारी' हा उपक्रम आहे. 'टेक वारी' ही संकल्पना वारीच्या सातत्यपूर्ण परंपरेप्रमाणेच प्रेरणादायी आहे. जसे वारकरी कोणत्याही परिस्थितीत पंढरपूरची वारी चुकवत नाहीत, तसेच आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात सातत्याने शिकणे अत्यावश्यक आहे. तंत्रज्ञान दररोज बदलत असून, ते आपण जर स्वीकारले नाही तर व्यक्ती काळाच्या ओघात मागे पडू शकतात. अक्षरज्ञानापासून इंटरनेटपर्यंत साक्षरतेची व्याख्या विकसित झाली असून आता ती एआयपर्यंत पोहोचली आहे. 'ज्याला एआय समजते आणि वापरता येते, तोच खऱ्या अर्थाने आज साक्षर आहे' असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एआयमुळे नोकरीच्या स्वरूपात मोठे बदल होणार असून, पुढील एक हजार दिवसात 80 ते 90 टक्के कामकाजाचे स्वरूप बदलू शकते, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.तंत्रज्ञानाला घाबरण्याऐवजी ते स्वीकारण्याची गरज अधोरेखित करताना त्यांनी संगणक क्रांतीचे उदाहरण दिले. संगणकामुळे कार्यक्षमता आणि पारदर्शकता वाढली, तसेच मोठ्या प्रमाणात सकारात्मक बदल झाले.'आयगॉट'प्लॅटफॉर्मद्वारे राज्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण घेतल्याचा उल्लेख करत त्यांनी अभिमान व्यक्त केला. विशेषतः एआय आणि आधुनिक तंत्रज्ञान विषयांबाबत अधिकाऱ्यांनी दाखवलेली उत्सुकता ही सकारात्मक बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. विविध विभागांनी एआय आणि ब्लॉकचेनसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ही क्षमता योग्य प्रकारे वापरली, तर महाराष्ट्र इतर राज्यांना मार्गदर्शन करू शकणारी कन्सल्टिंग क्षमता विकसित करू शकतो. एआय एजंट "वासुदेव" अत्यंत कार्यक्षम पद्धतीने काम करतात, त्यामुळे भविष्यात त्यांच्याशी स्पर्धा करण्यासाठी आपल्यालाही स्वतःची कौशल्ये सातत्याने अद्ययावत ठेवावी लागतील.

### 'टेक-वारी 2.0 महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह' आत्मविकासातून डिजिटल युगासाठी सक्षम होण्याची सुवर्णसंधी -उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सतत शिकत राहणे आवश्यक आहे. "'टेक-वारी 2.0"मधून केवळ तांत्रिक ज्ञान नव्हे, तर आत्मविकास, कार्यक्षमता आणि आधुनिक दृष्टिकोन विकसित करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.वारकऱ्यांची पंढरपूरकडे जाणारी वारी जशी शिस्त, श्रद्धा आणि एकात्मतेचे प्रतीक आहे, त्याचप्रमाणे "टेक वारी" ही प्रशासनाची तंत्रज्ञानाकडे वाटचाल दर्शविणारी चळवळ आहे. भविष्यात नागरिक-केंद्रित आणि सक्षम शासन घडवण्यासाठी ही वारी महत्त्वाची ठरणार आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 05/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपरी-चिंचवडमधील वीज समस्या सुटणार

## थेरगाव, रावेत, देहूगाव येथे उपकेंद्र होणार ; खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी, चिंचवड आणि मावळमधील भविष्यातील लोकसंख्या विचारात घेऊन वीज यंत्रणा सक्षम केली जाणार आहे. पुढील 20 वर्षे डोळ्यासमोर ठेऊन वीज पुरवठ्याचे नियोजन केले जात आहे. त्यानुसार पिंपरी, चिंचवड, थेरगाव, रावेत, तीर्थक्षेत्र देहूगाव येथे उपकेंद्राची निर्मिती केली जाणार आहे. रहाटणीतही उतिउच्चदाब केंद्र सुरु केले जाणार असून नवीन रोहित्र बसविले जाणार आहेत. ताथवडेत अतिउच्चदाब केंद्र उभारण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.**



मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभेतील विद्युत विषयक कामासंदर्भात खासदार श्रीरंग बारणे यांनी महावितरणाच्या पुण्यातील मुख्य कार्यालयात आढावा बैठक घेतली. चालू असलेली कामे, प्रलंबित कामे आणि प्रस्तावित कामांचा खासदार बारणे यांनी आढावा घेतला. प्रादेशिक संचालक सुनील काकडे, गणेशखिंड विभागाचे अधीक्षक अभियंता सिंहजीराव गायकवाड, ग्रामीणचे अधीक्षक अभियंता युवराज जरग, संजय नेते, कार्यकारी अभियंता सोमनाथ मुंडे, शेखर मुरकुटे, केशव काळुमाळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर यावेळी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, मामुर्डीतील उपकेंद्राचे मजबुतीकरण केले जाणार आहे. 22 केव्हीची भूमिगत वाहिनी टाकली जाणार आहे. थेरगाव, चिंचवड, रावेत, पिंपरी येथे उपकेंद्र कार्यान्वित केली जाणार आहेत. त्याअंतर्गत विविध कामे सुरु केली आहेत. देहूगाव येथे उपकेंद्राची निर्मिती केली जाणार आहे. ताथवडे येथे अतिउच्चदाब नवीन उपकेंद्र मंजूर आहे. यशदाच्या जागेत हे अतिउच्चदाब हे उपकेंद्र सुरु होणार आहे. येथील जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. रहाटणीतही उतिउच्चदाब केंद्र सुरु केले जाणार असून नवीन रोहित्र बसविले जाणार आहेत. त्याचे काम प्रगतीपथावर आहे. तळेगाव एमआयडीसीतील आंबीतील अतिउच्चदाब केंद्राची क्षमता वाढविण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

खासदार बारणे म्हणाले, विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे विविध कामे हाती घेतली जाणार आहे. विद्युत विषयक कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी ठेवला जातो. त्यासाठी यंदा 17 कोटींचा निधी ठेवला आहे. प्रधानमंत्री सुर्यघर योजनेअंतर्गत जास्तीत-जास्त लोकांपर्यंत जाऊन रुफटॉप सोलर बसवून द्यावेत. स्मार्ट मीटर बसविण्याबाबत जनजागृती करावी. त्यांच्या तक्रारींचे निराकरण करुन मीटर बसवावेत. सबस्टेशनसाठी केंद्र सरकारकडून राज्य सरकारला जास्तीत-जास्त निधी आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आत्तापर्यंत सर्वाधिक निधी महाराष्ट्राला मिळाला आहे.मावळ तालुक्यात तळेगाव दाभाडे, उर्से, अंबी, लोणावळा, पवनानगर येथे अति उच्चदाब केंद्र कार्यान्वित आहेत. लोणावळ्यात नांगराव येथे, तळेगाव दाभाडेतील अंबी, माळवाडी, मिंडेवाडी येथे लघुदाब व स्विचिंग उपकेंद्र कार्यान्वित आहे. यामुळे तळेगाव एमआयडीसी परिसरातील औद्योगिक ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा सुरु झाला आहे. भंडारा डोंगर येथे विद्युतीकरणाची एक कोटी 39 लाखांची कामे पूर्ण केली असल्याचेही बारणे यांनी सांगितले.

मावळ लोकसभा मतदारसंघातील विद्युत कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून दरवर्षी मोठी निधी मंजूर करुन घेतला जातो. त्यातून विविध कामे केली आहेत. राजमाची गाव विद्युतीकरणासाठी एक कोटींचा निधी मंजूर आहे. वडेश्वर येथे नवीन उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. गहुंजे येथे नवीन अतिउच्चदाब केंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामुळे तळेगावातील अति उच्चदाब केंद्रावरील भार कमी होणार असून मावळ तालुक्यातील ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा होण्यास फायदा होणार आहे. मिडेंवाडीतील अतिउच्चदाब केंद्रामुळे चाकण फेज टू या केंद्राचा भार कमी होऊन तळेगाव एमआयडीसीतील उद्योगांना फायदा होईल. या केंद्राचे काम प्रगतीपथावर असल्याचेही खासदार बारणे यांनी सांगितले.

# नसरापूर प्रकरणी आरोपीस फाशीच्या शिक्षेसाठी प्रयत्न

### मंत्री आदिती तटकरे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : नसरापूर येथे घडलेल्या अमानुष आणि संतापजनक घटनेची माहिती मिळाल्यानंतर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी पीडित मुलीच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला असून, त्या सातत्याने कुटुंबाच्या संपर्कात आहेत.



मनोधैर्य योजनेअंतर्गत पीडित कुटुंबाला आर्थिक सहाय्य दिले जाणार असून, आरोपीस फाशीची शिक्षा मिळावी, यासाठी विशेष सरकारी वकिलामार्फत संपूर्ण प्रयत्न करण्यात येणार असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.स्थानिक आमदार शंकर मांडेकर यांच्या माध्यमातून मंत्री तटकरे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. या कठीण प्रसंगी राज्य शासन पीडित कुटुंबाच्या पाठीशी उभे असून, प्रकरणाचा जलद निपटारा व्हावा यासाठी सुनावणी जलदगती न्यायालयात होणार असल्याचे त्यांनी ग्रामस्थांना आश्वासित केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि मंत्री आदिती तटकरे यांनी पीडित कुटुंबीय व ग्रामस्थांना न्याय मिळवून देण्याबाबत आश्वासन दिले आहे. यासंदर्भातील अधिकृत पत्र जिल्हा प्रशासनामार्फत कुटुंबीयांना देण्यात आले आहे.दरम्यान, महिला व बालविकास विभागाच्या वतीने मनोधैर्य योजनेअंतर्गत पीडित कुटुंबाला आर्थिक व मानसिक सहाय्य दिले जाणार असून, त्यासाठीची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत

# हायवेवर वादातून मारहाण; दुचाकीस्वाराचा नाकाचा फ्रॅक्चर, देहूरोडमध्ये गुन्हा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**देहूरोड : जुना पुणे–मुंबई महामार्गावर किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून दुचाकीस्वाराला मारहाण केल्याची घटना देहूरोड येथे घडली असून या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या मारहाणीत फिर्यादीच्या नाकाला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.**



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रोहीदास शांताराम जाधव (वय 48, रा. शेलारवाडी, ता. मावळ) हे दि. 1 मे 2026 रोजी रात्री सुमारे 9 वाजता त्यांच्या इलेक्ट्रिक दुचाकी (चेतक) वरून देहूरोडहून शेलारवाडीकडे जात होते. सेंट्रल चौकाच्या पुढे, सेक्रान हॉस्पिटलसमोर डिव्हायडरजवळ, सँट्रो कार (MH 12 CY 3455) ही अचानक डिव्हायडर क्रॉस करून महामार्गावर आल्याने फिर्यादीने गाडी नियंत्रणात आणत चालकास जाब विचारला. यावरून कारमधील नरेंद्र अशोक मुरूडकर (रा. धायरी, पुणे) व त्याचा एक साथीदार खाली उतरून फिर्यादीला शिवीगाळ करत मारहाण केली. यावेळी एका आरोपीने हाताने नाकावर जोरदार ठोसा मारल्याने फिर्यादीच्या नाकाचे फ्रॅक्चर झाले. तसेच पाठीसह शरीराच्या इतर भागांवरही मार लागला.

या घटनेप्रकरणी देहूरोड पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम 117 (2), 352, 351 (2), 3 (5) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा दि. 3 मे 2026 रोजी सायंकाळी 5.36 वाजता नोंदवण्यात आला.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार बांबळे करीत असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे, तर दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे.

# सरकारी नोकरीचे आमिष दाखवून 7.45 लाखांची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : रावेत पोलीस ठाण्याच्या हद्दीत सरकारी नोकरीचे आमिष दाखवून तब्बल 7 लाख 45 हजार 500 रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी आरोपी खुशी वसंतराव देशमुख (रा. शिव नगरी, मंदिराजवळ, बिजली नगर, चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे) हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अद्याप अटक करण्यात आलेली नाही.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना दि. 15 जुलै 2021 ते 16 जुलै 2025 दरम्यान किवळे परिसरात घडली. आरोपीने फिर्यादी महिलेस तसेच तिची मैत्रीण तृप्ती निलेश दैठनकर यांना येरवडा येथील जेल विभागात ज्युनिअर क्लार्क आणि सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर पदावर सरकारी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले. यासाठी वेळोवेळी मोठ्या रकमेची मागणी करत आरोपीने एकूण 7,45,500 रुपये उकळले.

नोकरी लावून देण्याचे आश्वासन पूर्ण न झाल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादी महिलेने तक्रार दाखल केली. त्यानुसार रावेत पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 318 (4) व 316 (2) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

हा गुन्हा दि. 3 मे 2026 रोजी दुपारी 3.03 वाजता दाखल करण्यात आला.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक टार्फे करीत आहेत. आरोपीचा शोध सुरू असून लवकरच अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 05/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# दिव्यांग बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उद्योग क्षेत्र एकत्र

## महापालिका दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या वतीने 'मिशन संधी'ची दमदार सुरुवात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उभारलेले दिव्यांग भवन हे केवळ आपल्या शहरापुरते मर्यादित न राहता, देशभरातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर आदर्श मॉडेल म्हणून उभे राहत आहे. यामध्ये शहरातील उद्योगसमूह, व्यावसायिक आणि कॉर्पोरेट क्षेत्राने 'मिशन संधी'सारख्या उपक्रमात सक्रिय सहभाग घेणे ही काळाची गरज आहे. केवळ सामाजिक जबाबदारी म्हणून नव्हे, तर एक समावेशक आणि सक्षम समाज घडविण्याच्या दृष्टीने त्यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. अधिकाधिक संस्थांनी रोजगाराच्या संधी निर्माण करून, कौशल्य विकासाला चालना देऊन आणि सीएसआरच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांना ठोस सहकार्य देऊन या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिका दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या वतीने "मिशन संधी" या उपक्रमाचा शुभारंभ वाकड येथील हॉटेल सयाजी येथे उत्साहात पार पडला. दिव्यांग बांधवांना स्वयंपूर्ण, सक्षम आणि मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शाश्वत एम्प्लॉयर इकोसिस्टम उभारण्याच्या उद्देशाने वर्षभर चालणाऱ्या व्यापक मोहिमेची ही प्रभावी सुरुवात ठरली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना महापौर रवि लांडगे बोलत होते.

या कार्यक्रमास स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे, लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष अभय भोर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी तसेच विविध कंपन्यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उभारलेले दिव्यांग भवन हे केवळ आपल्या शहरापुरते मर्यादित न राहता, देशभरातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर आदर्श मॉडेल म्हणून उभे राहत आहे. 2024 पासून सुरु झालेल्या या उपक्रमाच्या माध्यमातून अनेक दिव्यांग बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यात यश मिळाले असून, त्यांच्या जीवनात सकारात्मक आणि आत्मनिर्भरतेकडे नेणारा बदल घडत आहे. या यशामागे कॉर्पोरेट क्षेत्राचे आणि सीएसआर निधीच्या माध्यमातून मिळालेल्या सहकार्याचे मोठे योगदान आहे. दिव्यांग भवनमध्ये 21 प्रकारच्या दिव्यांगत्वासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित थेरपी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे हे केंद्र केवळ उपचारापुरते मर्यादित न राहता, दिव्यांग बांधवांसाठी आत्मविश्वास, सन्मान आणि नव्या संधी निर्माण करणारे एक सक्षम व्यासपीठ ठरत आहे. तसेच महापौर पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर या केंद्राला भेट दिली तेव्हा मला खऱ्या अर्थाने आत्मिक समाधान मिळाले. आगामी काळात दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र वसतीगृह उभारण्याचा महापालिकेचा मानस आहे. मात्र, या सर्व उपक्रमांमध्ये व्यावसायिकांचेही सहकार्य अपेक्षित आहे.शहरातील उद्योगसमूह, व्यावसायिक आणि कॉर्पोरेट क्षेत्राने 'मिशन संधी'सारख्या उपक्रमात सक्रिय सहभाग घेणे ही काळाची गरज आहे. केवळ सामाजिक जबाबदारी म्हणून नव्हे, तर एक समावेशक आणि सक्षम समाज घडविण्याच्या दृष्टीने त्यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

अधिकाधिक संस्थांनी रोजगाराच्या संधी निर्माण करून, कौशल्य विकासाला चालना देऊन आणि सीएसआरच्या माध्यमातून ठोस सहकार्य देऊन या चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन देखील महापौर रवि लांडगे यांनी केले.

# चिमुकलीच्या न्यायासाठी लढा थांबणार नाही - डॉ. नीलम गोऱ्हे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या झाल्याच्या घटनेने राज्यभर संताप व्यक्त होत असताना, शिवसेना नेत्या व विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुण्यातील पीडित मुलीच्या घरी जाऊन कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली.**



या भेटीदरम्यान कुटुंबीयांचे दुःख पाहून डॉ. गोऱ्हे भावूक झाल्या. "आईच्या हंबरड्याने मन हेलावले. या चिमुकलीला न्याय मिळवून देण्यासाठी लढा शेवटपर्यंत सुरु राहील," असे त्यांनी सांगितले. कुटुंब प्रचंड मानसिक धक्क्यात असल्याने कोणतेही फोटो किंवा व्हिडिओ न करता शांततेत संवाद साधल्याचेही त्यांनी नमूद केले.कुटुंबीय व स्थानिक नागरिकांनी आरोपीला तातडीने कठोर शिक्षा देण्याची मागणी केली असून, यासाठी वरिष्ठ सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्याकडे पाठपुरावा सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.बालहक्क आयोगाने या प्रकरणात अधिक जबाबदारीने काम करण्याची गरज असल्याचे सांगताना, योग्य सही व पोलीस स्टेशनच्या गुन्हा क्रमांकासह प्रकरणाचा पाठपुरावा करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी विशेष तपास समिती स्थापन केल्याचे पत्र प्राप्त झाले असून त्याची प्रतही घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुटुंबाशी संवाद साधून त्यांना धीर दिला असून, सरकार संपूर्णपणे कुटुंबाच्या पाठीशी उभे असल्याचा संदेश दिला आहे.

"न्याय मिळवून देणे, तसेच कुटुंबाचे संरक्षण व पुनर्वसन करणे ही सरकारची बांधिलकी आहे," असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.सोशल मिडियावर पीडित मुलीचे फोटो किंवा ओळख उघड करणारे संदेश प्रसारित होणे हे गंभीर व बेकायदेशीर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "पॉक्सो कायद्यानुसार पीडितेची ओळख उघड करणे गुन्हा आहे. नागरिकांनी असे संदेश तात्काळ डिलीट करावेत," असे आवाहन त्यांनी केले.

उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयानेही याबाबत स्पष्ट निर्देश दिले असल्याचे त्यांनी सांगितले.या घटनेचा जात-धर्माच्या आधारावर गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवरही त्यांनी तीव्र शब्दांत टीका केली. "न्याय हा धर्म किंवा जात पाहून होत नाही. सर्व समाज एकत्र येऊन पीडित कुटुंबाच्या पाठीशी उभा आहे, हेच खरे चित्र आहे," असे त्यांनी नमूद केले.

काही घटक पीडित कुटुंबाला आंदोलनात सहभागी होण्यास प्रवृत्त करत असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. "दुःखात असलेल्या कुटुंबाला आंदोलनासाठी भाग पाडणे हे अमानुष आहे.

आंदोलन करायचे असल्यास इतरांनी करावे, पण कुटुंबाला त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी," असे त्यांनी स्पष्ट केले.माध्यमांमधून व सोशल मीडियातून काही चुकीची माहिती पसरवली जात असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले.

पीडित मुलीच्या वडिलांशी पोलिसांनी गैरवर्तन केल्याचा आरोप चुकीचा असल्याचे कुटुंबीयांनी स्वतः सांगितल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968